**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७० वा | शुक्रवार, दि.०६ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला...

## जिल्ह्याच्या राजकारणाची खरी 'लिटमस टेस्ट'

## घराणेशाही, बंडखोरी आणि स्थानिक आघाड्या

## सोलापूरच्या राजकारणाचा निकाल ठरवणारी लढाई

**सोलापूर (सचिन जाधव):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ जागांसाठी तब्बल २७१ उमेदवार, तर पंचायत समितीच्या १३६ जागांसाठी ४८५ उमेदवार रिंगणात उतरल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या निवडणुकीकडे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची लढाई म्हणून पाहिले जात नसून, जिल्ह्याच्या भविष्यातील राजकीय समीकरणे ठरवणारी 'लिटमस टेस्ट' म्हणूनच तिचे महत्त्व वाढले आहे.

राजकीय पक्षांसह स्थानिक आघाड्या, बंडखोर उमेदवार आणि घरातील सदस्यांना मैदानात उतरवलेले दिग्गज नेते यामुळे यंदाची निवडणूक अत्यंत रंगतदार बनली आहे. या निवडणुकीचा निकाल आगामी विधानसभा व लोकसभा राजकारणावर थेट परिणाम करणारा ठरणार असल्याने सर्वच पक्षांनी आपली ताकद पणाला लावली आहे.

### दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

या निवडणुकीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार दीपक साळुंखे यांसारख्या अनेक दिग्गज नेत्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांना थेट मैदानात उतरवले आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ कार्यकर्त्यांची नव्हे, तर प्रस्थापित नेत्यांच्या राजकीय अस्तित्वाची लढाई बनली आहे.

गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील राजकारणात मोठ्या उलथापालथी झाल्या. पक्षफुटी, आघाड्या, युती आणि वैयक्तिक समीकरणे यामुळे मतदार संभ्रमात असून, या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद निवडणूक ही मतदारांचा मूड दाखवणारी पहिली मोठी चाचणी ठरणार आहे.

### 'निष्ठेपेक्षा जिंकण्याची क्षमता' महत्त्वाची

यंदा उमेदवारी देताना अनेक पक्षांनी निष्ठावंत कार्यकर्त्यांपेक्षा 'निवडून येण्याची क्षमता' पाहून आयात उमेदवारांवर भर दिल्याचे चित्र आहे. परिणामी, अनेक ठिकाणी बंडखोरी झाली. काही मतदारसंघांत ही बंडखोरी वरिष्ठ नेत्यांनी समजूत काढून शांत केली असली, तरी कार्यकर्त्यांमधील नाराजी कितपत दाबली गेली आहे, **(पान 2 वर..)**

> **निकालातून स्पष्ट होणार दिशा**
>
> सोलापूर जिल्हा परिषद निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेपुरती मर्यादित राहणार नाही, तर ती जिल्ह्याच्या राजकीय भवितव्याची दिशा ठरवणारी ठरणार आहे. कोणत्या पक्षाची ताकद वाढली, कोणत्या नेत्यांचे वर्चस्व टिकले आणि कुणाला धक्का बसला, हे या निकालातून स्पष्ट होईल. मतदारांनी विकासकामे, स्थानिक प्रश्न आणि कार्यक्षम नेतृत्व याला किती महत्त्व दिले, की पुन्हा एकदा पारंपरिक राजकारणालाच कौल दिला, याचे उत्तर ही निवडणूक देणार आहे. त्यामुळेच सोलापूर जिल्हा परिषद निवडणूक म्हणजे संपूर्ण जिल्ह्याच्या राजकारणाची खरी 'लिटमस टेस्ट' ठरत आहे.




### स्थानिक आघाड्यांचे आव्हान


पंढरपूर, करमाळा आणि सांगोला तालुक्यांत प्रस्थापित पक्षांच्या विरोधात स्थानिक आघाड्यांनी दिलेले आव्हान विशेष लक्षवेधी ठरत आहे. या आघाड्यांनी 'स्थानिक प्रश्न, स्थानिक नेतृत्व' हा मुद्दा पुढे करत पक्षीय राजकारणाला थेट आव्हान दिले आहे.

या भागांत विकासकामांबाबत असलेली नाराजी, तसेच पारंपरिक राजकारणाला कंटाळलेले मतदार स्थानिक आघाड्यांकडे वळतील का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### प्रचारात वारशापेक्षा विकासाचे मुद्दे

या निवडणुकीच्या प्रचारात राजकीय वारसा, घराणेशाही आणि नातेसंबंध यांची चर्चा मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी प्रत्यक्षात मतदारांच्या दृष्टीने 'जलजीवन मिशन'ची अर्धवट कामे, आरोग्य केंद्रांची दुरवस्था आणि ग्रामीण रस्त्यांची अवस्था हे कळीचे मुद्दे ठरत आहेत.

अनेक गावांत अजूनही नळपाणी योजना पूर्ण झालेल्या नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रांत डॉक्टरांची कमतरता, औषधांचा तुटवडा आणि रुग्णवाहिकेची अनुपलब्धता या समस्या जनतेच्या संतापाचे कारण बनल्या आहेत. त्याचप्रमाणे, पावसाळ्यात चिखलात जाणारे ग्रामीण रस्ते आणि रखडलेली कामे यावर उमेदवारांना जाब विचारला जात आहे.




## संपादकीय

# आशावाद

संसदेत सादर करण्यात आलेल्या आर्थिक पाहणी अहवाल 2025-26 मध्ये जागतिक आव्हानांचा सामना करताना भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक लवचिक आणि गतिशील बनवण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. हा अहवाल अशा अनेक आव्हानांकडे निर्देश करतो ज्यासाठी भविष्यात अत्यंत सावधगिरीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक ठरणार आहे.

जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचा नावलौकिक कायम असून चालू आर्थिक वर्षात भारताचा विकासदर म्हणजेच जीडीपी 7.4 टक्के राहण्याचा विश्वास या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आगामी 2026-27 या आर्थिक वर्षात विकासदराचा अंदाज 6.8 ते 7.2 टक्क्यांच्या दरम्यान वर्तवण्यात आला आहे. हा अंदाज वर्तवताना सीमावर्ती तणाव, जागतिक व्यापारातील अडथळे आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता यांसारख्या घटकांचा गांभीयार्ने विचार करण्यात आला आहे. अहवालातील हा आशावाद प्रामुख्याने देशांतर्गत मागणी, उपभोग आणि गुंतवणुकीतील मजबुतीवर आधारित आहे. जागतिक स्तरावर टॅरिफ किंवा सीमाशुल्कावरून निर्माण होणारे तणाव आणि पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा यांसारखे बाह्य धोके कायम असले तरी भारताने आपल्या अपेक्षांचे संतुलन राखले आहे.

हा अहवाल यथार्थवादावर आधारित असून केवळ भांडवली प्रवाह किंवा चलनाची ताकद यशस्वी अर्थव्यवस्थेची खात्री देऊ शकत नाही हे यात स्पष्टपणे मांडण्यात आले आहे. विशेषतः एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे निर्माण होणारे फायदे विषमतेला चालना देऊ शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे. या तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी सक्षम मानवी संसाधन आणि नियामक चौकटीची आवश्यकता असते. भारतासारख्या श्रमशक्तीचे प्राबल्य असलेल्या देशात ही गरज अधिक तीव्रतेने जाणवते. जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताने या संधीचा लाभ उठवणे गरजेचे आहे.

त्यासाठी कौशल्य विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असून याद्वारेच आपण दर्जेदार स्वदेशी उत्पादनांच्या जोरावर जागतिक आर्थिक स्पर्धेला तोंड देऊ शकतो. अशा प्रयत्नांमुळे निर्यात वाढण्यास मदत होईल आणि कालांतराने व्यापार तूट कमी करणे शक्य होईल. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उद्भवणारे संकट हे 2008 च्या जागतिक आर्थिक मंदीपेक्षाही भयानक असू शकते, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पांढरपेशा नोर्कयांवर याचे थेट सावट असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'एआय' क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक झाली असली, तरी त्याचा परतावा मिळण्याचा कालावधी मोठा आहे, जे अर्थव्यवस्थेसाठी जोखमीचे ठरू शकते.

आर्थिक पाहणी अहवालाने एक महत्त्वाकांक्षी आराखडा मांडण्याचा प्रयत्न केला आहे ज्यामध्ये स्वदेशी मोहिमेला महत्त्व देण्यापासून ते धोरणात्मक लवचिकतेपर्यंत अनेक बाबींचा समावेश आहे. मात्र भारताची खरी आर्थिक क्षमता तेव्हाच सिद्ध होईल जेव्हा भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंची विश्वासार्हता आंतरराष्ट्रीय दर्जाची असेल. जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादने 'खरेदी करण्याचा विचार करण्यापेक्षा' ती 'कोणताही विचार न करता खरेदी करण्यासारखी' दर्जाची बनवणे हे एक मोठे आव्हान आहे. ही स्थिती साध्य करण्यासाठी उत्पादन क्षेत्रातील कटिबद्धता वाढवावी लागेल. अलीकडेच युरोपियन युनियनसोबत झालेल्या ऐतिहासिक करारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत उत्साहाचे वातावरण असून त्याचे दीर्घकालीन सकारात्मक परिणाम अपेक्षित आहेत.

दुसरीकडे भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत अजूनही अनिश्चितता असली तरी या आर्थिक वर्षात तो यशस्वी होण्याची शक्यता अहवालात वर्तवण्यात आली आहे. या सर्व आर्थिक प्रगतीमध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की या वेगवान विकासाचा लाभ सामान्य माणसाला किती मिळतो. जगातील सर्वात मोठी युवा श्रमशक्ती असलेल्या देशात तरुणांच्या क्षमतेनुसार त्यांना रोजगार मिळवून देणे हे 'विकसित भारत' संकल्पातील मोठे आव्हान आहे. देशातील बेरोजगारीचा दर कमी करणे आणि तरुणांचे परदेशात होणारे स्थलांतर रोखण्यासाठी ठोस उपक्रम राबवणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर या अहवालात दोन दशके जुन्या माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींमध्ये बदल करण्याची मानसिकता व्यक्त करण्यात आली आहे.

अशा प्रकारचा कोणताही बदल हा तार्किक आणि पारदर्शक असायला हवा जेणेकरून लोकशाहीतील माहितीचा अधिकार अबाधित राहील. कृषी क्षेत्र हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, कृषी निर्यातीबाबतच्या वारंवार बदलणाऱ्या धोरणांमुळे पुरवठा साखळीत अडथळे येताहेत, याबाबत अहवालात व्यक्त करण्यात आलेली चिंता महत्त्वाची आहे. आगामी अर्थसंकल्पात या त्रुटी कशा दूर केल्या जातात, याकडे सर्वांचे लक्ष असेल. अर्थसंकल्प असो किंवा आर्थिक पाहणी अहवाल; याचे मूल्यमापन करण्यासाठी भांडवली बाजाराची दिशा हे प्रचलित एकक आहे. तथापि, मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी भारतीय बाजार सध्या दीर्घकालीन नफा कमावण्याच्या क्षमतेपेक्षा खूप पुढे निघून गेला आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी सावध राहणे गरजेचे आहे, असे म्हटले असून ही धोक्याची घंटा म्हणावयास हवी. काल सोने आणि चांदीच्या दरामध्ये झालेली विक्रमी घसरण सर्वसामान्यांना दिलासा देणारी ठरणारी आहे; पण भांडवली बाजारात असा मोठा गडगडाट झाला तर एसआयपी, म्युच्युअल फंड यांमधील गुंतवणुकीकडे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणून पाहणाऱ्या अनेकांना हा धक्का पचवता येणार नाही. जागतिक विकास आणि व्यापार आतापर्यंत अपेक्षेपेक्षा चांगला राहिला असला तरी, त्यामागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट नाहीत.

# 'सर'



कम्प्युटर माईंड, मास्टर माईंड, किंग मेकर, मार्गदर्शक हे सगळं म्हणून झालंय. याचा अर्थ म्हणायचं राहिलं नाही असं नाही. आता या सगळ्या शब्दांचं एकत्रीकरण झालंय आणि त्या सगळ्या शब्दांचा मिळून एक शब्द तयार झाला तो म्हणजे "सर". एस , नामही काफी है! आता घुमरे सर म्हणायची गरज नाही. नुसतं सर म्हटलं की त्यात सगळं आलं.कॉम्प्युटर माईंड, मास्टर माईंड, किंग मेकर, मार्गदर्शक हे तर आलंच शिवाय सर या शब्दात प्रेम आलं, जिव्हाळा आला, आपुलकी आली, बांधीलकी आली, जबाबदारी आली, त्याग आला, खंबीरपणा आला, हळवेपण आलं, नातं आलं, हक्क आले आणि हक्काबरोबर रागावणंही आलं .

सर कुठल्या भोज्याला शिवून आले नाहीत असं नाही. कला, सांस्कृतिक ,क्रीडा ,साहित्य, सहकार,राजकारण ,समाजकारण वगैरे वगैरे आणि हा हा भोज्याला शिवायचा सूरफाट्याचा खेळ अजून संपलेला नाही आणि म्हणून तर प्रत्येक क्षेत्रामध्ये सरांचा अजूनही तेवढाच सक्रिय सहभाग असतो. सर्वसामान्या पेक्षा सरांकडे असणारी गुणवैशिष्ट्ये निश्चितच वेगळी असल्यामुळे सर ही अर्थातच सर्वसामान्या पेक्षा निश्चितच वेगळे . इतरांकडे भलेही पुस्तकांची भांडारे असतील पण सरांकडे माणसांची भांडारेआहेत. पुस्तक ठेवायला माणसाकडे लाकडी कप्पे असावे लागतात. सरांकडे माणसं ठेवायला त्यांचं मन पुरेसं आहे. असंख्य माणसं मावतील एवढे कप्पे असणारं त्यांचं मनही मोठं आहे. कधी केला असेल सरांनी एवढ्या सगळ्या माणसांचा अभ्यास? नाही. यासाठी खास असा सरांकडे वेगळा वेळ नाही. नाहीच मुळी. मग या प्रश्नाचे उत्तर? ते असे... सरांकडे ती एक उपजतच प्रतिभा शक्ती आहे. सरांकडे हे एक वेगळे अंग आहे आणि म्हणून तर ज्या व्यक्तीला स्वतःची नीट ओळख देता येत नाही ती ओळख फक्त सरांनीच सांगावी. असो, यामुळे तर त्यांचा जनसंपर्क आणि मित्रपरिवार खूपच दांडगा आहे. भौतिक संपत्ती बरोबरच सरांनी मिळवलेली माणसांची संपत्ती ही भली मोठी आहे. आज सर एक्काहत्तरीत असतानाही चिरतरुण वाटतात त्याचं अनेकातलं हे एक महत्त्वाचं कारण. तात्पर्य दोन्ही अंगानं सर श्रीमंत ,खूप श्रीमंत. हे त्यांच्या वागण्या बोलण्यावरून सहज दिसून येते . बघणाऱ्याकडे तेवढे दृष्टी असावी लागते एवढेच. खरं तर कुठल्याही माणसाला सहजासहजी मोठेपण मिळत नाही. तसे तर उन्हाळे पावसाळे सगळ्यांच्याच वाट्याला येतात. पण मोठ्या माणसांना पावसाळ्याची शितलता जेवढी आल्हाददायक तेवढी उन्हाळ्याची दाहकता कितीतरी पटींनं जास्त असते आणि म्हणूनच लाक्षणिक अर्थाने सरांनी अनुभवलेले उन्हाळी पावसाळी हे ऋतू सर्वसामान्या पेक्षा निश्चितच वेगळे.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये काम करणारी कुठलीही व्यक्ती ही माझ्या कुटुंबातीलच आहे ही सरांची भावना असल्यामुळे तेथे एक मोठा परिवार तयार झाला. त्याचे नाव यशवंत परिवार. परिवारातील प्रत्येक सदस्याच्या सुखदुःखाचे सर वाटेकरी असतात परिणामी दुःख हलकं करण्यात आणि सुख वाढवण्यात सर अग्रेसर असतात त्यामुळे तेथील प्रत्येकाला सरांचा एक मोठा आधार वाटतो आणि म्हणून तर सगळ्यांनी मिळून सरांना "आधारवड" ही पदवी बहाल केली आहे.

जसं सरांचं माणसाशी नातं आहे तसं कॉलेज मधील मातीच्या कणाकणाशी सर नातं जोडून आहेत.

त्याचा परिणाम म्हणून कॉलेजची इमारत, त्याच्या मागचा पुढचा परिसर आणि बाहेरचे मोठे प्रांगण या सगळ्यांची भव्यता, आखीव रेखीवपणा आणि नीटनेटकेपणा अगदी तिथे येणाऱ्या प्रत्येकाच्या सहज लक्षात येतो. सरांसारखी एखादी व्यक्ती जेव्हा मोठी होते तेव्हा फक्त एकटे सर मोठे होत नाहीत तर सरांना जोडली गेलेली माणसे, परिसर, कार्यक्षेत्र हेही तितकेच मोठे होत जातात आणि म्हणून तर आपसूकच सगळ्यांची हीच भावना होते की सरांनी खूप खूप मोठे व्हावे. सगळ्या अर्थाने. त्यांना उत्तम आरोग्य लाभावे सर दीर्घायुषी व्हावेत ही सदिच्छा.

**- माजी प्राचार्य**
**मा. नागेश माने सर**

# गोरे यांच्या वक्तव्यावर काँग्रेसचा पलटवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर केलेली टीका पदाला न शोभणारी असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांनी व्यक्त केली. महिला नेत्यांवर अशा प्रकारची टीका करणे योग्य नसून पालकमंत्र्यांनी आपल्या पदाला साजेशी भाषा वापरावी, असे त्यांनी सांगितले.

माजी आमदार विश्वनाथ चाकोते आणि माजी महापौर आरिफ शेख यांनी पत्रकार परिषद घेऊन विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केले. या वेळी माजी महापौर आरिफ शेख यांनी महापालिका निवडणुकीतील पराभवाबाबत काँग्रेसच्या शहराध्यक्षांवर आरोप करत, 'आपण का हरलो याचे पुरावे लवकरच सादर करू,' असे सांगितले.

पालकमंत्र्यांच्या वक्तव्याला काँग्रेसकडून योग्य प्रत्युत्तर न मिळाल्याची खंत व्यक्त करत चाकोते म्हणाले की, अशा वेळी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रतिक्रिया देणे अपेक्षित होते. मात्र फक्त सुमन जाधव यांनी प्रतिउत्तर दिले.

महापालिका निवडणुकीत १०२ पैकी केवळ दोन जागा मिळाल्याने काँग्रेसची मोठी नामुष्की झाली असल्याचे सांगत शहराध्यक्षांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. या संदर्भात पक्षश्रेष्ठींना लेखी निवेदन दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# अंबानी समूह प्रकरणी ईडी-सीबीआयला चौकशीचे सुप्रीम कोर्टाचे आदेश



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** अनिल अंबानी आणि अंबानी समूह (एडीएजी) कंपन्यांशी संबंधित कथित सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या बँकिंग व सहकार फसवणूक प्रकरणाची निष्पक्ष व तत्काळ चौकशी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (सीबीआय) यांना दिले आहेत. तपासातील विलंबाबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. खंडपीठाने ईडी आणि सीबीआयला पुढील चार आठवड्यांत नव्याने स्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

माजी नोकरदार ई.ए.एस. सरमा यांनी दाखल केलेल्या याचिकेत अनिल अंबानी देश सोडून विदेशात जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र अंबानी यांचे वकील मुकुल रोहतगी यांनी हा दावा फेटाळून लावत अंबानी परवानगीशिवाय देश सोडणार नाहीत, असे स्पष्ट केले.

अनेक वित्तीय संस्थांकडून तक्रारी मिळूनही सीबीआयने २०२५ मध्ये भारतीय स्टेट बँकेच्या तक्रारीवरून केवळ एकच गुन्हा दाखल केल्याबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. प्रत्येक बँकेने स्वतंत्र तक्रारी नोंदवल्याने सीबीआयने स्वतंत्र गुन्हे दाखल करणे अपेक्षित होते, असेही न्यायालयाने नमूद केले.

या प्रकरणात चौकशीचा वेग वाढवून निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे निर्देश ईडीला देण्यात आले आहेत. तसेच बँक अधिकाऱ्यांचा या प्रकरणातील संभाव्य सहभाग तपासण्याचे आदेशही खंडपीठाने दिले.

# चाऱ्याअभावी दूध उत्पादन घटण्याची भीती




**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यात पशुधन मोठ्या प्रमाणात असून सर्वत्र ओल्या चाऱ्याचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. उन्हाळा येण्यापूर्वीच चाऱ्याची बिकट परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे. सदाशिवनगर, यशवंतनगर, माळीनगर व श्रीपूर येथील साखर कारखान्यांवर उसाचे वाडे मिळवण्यासाठी शेतकरी व पशुपालकांची झुंबड उडत आहे. उपलब्ध असलेल्या ओल्या चाऱ्यासाठीही मोठी गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

तालुक्यात सध्या 'पाणी आहे, पण चारा नाही'अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यात शेळ्या १ लाख ६७ हजार ३५५, मेंढ्या ३२ हजार ८०६, गायी १ लाख ४६ हजार ७८३ आणि म्हशी ७६ हजार २२८ असे एकूण २ लाखांहून अधिक पशुधन आहे. मे महिन्यातील पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मका पिकाला पसंती दिली; मात्र ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पेरलेला मका आधीच संपला आहे. सततच्या पावसामुळे उसाची वाढही अपेक्षित झाली नाही. त्यामुळे मार्च-एप्रिलपर्यंत सुरू राहणारे कारखाने यंदा फेब्रुवारीतच बंद होण्याची शक्यता आहे.

उस कापणीसाठी यंत्रांचा वापर वाढल्याने उसाचे वाडे उपलब्ध होत नाहीत.

पूर्वी बैलगाडीद्वारे ऊस वाहतूक होत असल्याने बैलगाडी मालकांकडून जादा वाडे विक्रीस मिळत होते; परंतु आता तेही बंद झाले आहे. ओल्या चाऱ्यासाठी मक्याचा दर २२ ते २५ हजार रुपये गुंठ्यापर्यंत पोहोचला आहे. दरम्यान, शेतातील गवतावर तणनाशक फवारणीमुळे गवतही मिळेनासे झाले आहे. गुऱ्हाळांवरून मिळणारे वाडे १०० रुपयांना १६ पेंड्यांनी विकले जात असून त्यासाठीही शेतकऱ्यांची गर्दी होत आहे. सकस आहाराअभावी जनावरांच्या दूध उत्पादनावर परिणाम होत असून फॅट कमी झाल्याने दर मिळत नसल्याची खंत दूध उत्पादक तानाजी बनकर यांनी व्यक्त केली.

# शंकरनगर-अकलूज येथे महाशिवरात्र यात्रेचे आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षी महाशिवरात्र यात्रेचे आयोजन बुधवार दिनांक ११/०२/२०२६ ते सोमवार दिनांक १६/०२/२०२६ या कालावधीमध्ये केले आहे. यामध्ये महाशिवरात्र यात्रा, कृषी व औद्योगिक प्रदर्शन, पीक प्रदर्शन व स्पर्धा, दुग्ध स्पर्धा, जनावरांचा बाजार तसेच जंगी कुस्त्यांच्या फडाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

यात्रा नियोजनामध्ये बुधवार दि.११/०२/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता यात्रा व प्रदर्शनाचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते व कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका-स. म. शंकरराव मोहिते-पाटील स. सा. का. लि., शंकरनगर-अकलूज तसेच इतर मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे.

शनिवार १४/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. पीक स्पर्धेमध्ये आलेल्या शेती मालाचे उत्कृष्ट नमुन्यांचे परीक्षकांकडून निरिक्षण व बक्षीसपात्र नमुन्यांची निवड तसेच दुपारी ४.०० वा. जातीवंत जनावरांची निवड होणार आहे.

रविवार दि.१५/०२/२०२६ रोजी पहाटे ५.३० वा. महाशिवरात्री निमित्त श्रीशिवपार्वती अभिषेक व महापूजा विश्वतेजसिंह रणजितसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष-ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, शंकरनगर व त्यांच्या सुविद्य पत्नी मा.सौ. शिवांशिका विश्वतेजसिंह मोहिते-पाटील या उभयतांचे शुभहस्ते आयोजित केली आहे. सदर दिवशी सकाळी ६.३० ते ७.०० या वेळेत दुग्ध स्पर्धेचे आयोजन केले असून यात्रेमध्ये होणा-या सर्व स्पर्धेतील विजेत्याना बक्षीस वाटप करणेचा कार्यक्रम सदर दिवशी सायं. ५.०० वा. यात्रा ऑफिस समोर होणार आहे.

सोमवार दि.१६/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. मल्लांच्या जंगी कुस्त्याच्या फडाचे उद्घाटन विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व कार्याध्यक्ष मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील, तसेच सयाजिराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील, नगरसेवक नगरपरिषद, अकलूज यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे.

महाशिवरात्र यात्रेमध्ये लहान मुलांकरिता खेळणी स्टॉल, विविध पाळणे, अल्पोपाहार व रसपाणगृह स्टॉल येणार असून यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात रेलचेल होणार असून यात्रा कालावधीमध्ये चोवीस तास पाणी, वीज, पयार्यी रस्ते तसेच आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व त्या सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

तसेच रविवार दि.१५/०२/२०२६ रोजी रात्री ८.०० वा. यात्रा व पंचक्रोशीतील रसिक प्रेक्षकांकरिता मंगला बनसोडे लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी, पंचक्रोशीतील भाविकांनी व नागरिकांनी यात्रेचा व विविध प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विकासाच्या मुद्द्यावर मत द्या; सांगोल्यात महायुतीशिवाय पर्याय नाही- शहाजीबापू पाटील



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्यात गेल्या काही वर्षात विकास कामांचा ठसा उमटलेला असून शेती, पाणी, रस्ते व वीज यासारख्या मूलभूत प्रश्नांवर निर्णायक काम झाले आहे. ग्रामीण भागाचा विकास केवळ आश्वासनांवर नव्हे तर ठोस कृतीतून साध्य करायचा असेल तर महायुतीला साथ देणे काळाची गरज आहे, असे ठाम मत माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले. चोपडी जिल्हा परिषद गटाचे महायुतीचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत आणि राजुरी पंचायत समिती गणाचे उमेदवार डॉ. सदाशिव दबडे यांच्या प्रचारार्थ मानेगाव येथे आयोजित सभेत ते बोलत होते. या सभेला नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले की, गेल्या पाच वर्षात तालुक्यात शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करण्यात आले. विविध जलसिंचन योजना, कालवे व पाणी साठवण प्रकल्पांमुळे बागायती शेतीचे प्रमाण वाढले असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहे. ग्रामीण रस्त्यांची कामे, पिण्याच्या पाण्याच्या योजना, वीजपुरवठा व डीपीचे अनेक वर्षांपासून रखडलेले प्रश्न मार्गी लागले आहेत. केंद्र व राज्यात महायुतीचे सरकार असल्याने निधी मिळवण्यात अडचणी येत नाहीत. हाच विकासाचा धागा जिल्हा परिषद व पंचायत समितीपर्यंत पोहोचवायचा असेल, तर तेथेही महायुतीची सत्ता येणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. त्यामुळे चोपडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार चेतनसिंह केदार सावंत आणि राजुरी पंचायत समिती गणाचे उमेदवार डॉ. सदाशिव दबडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले. यावेळी उमेदवार चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेत महायुतीची सत्ता आल्यास पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या प्रश्नांवर प्राधान्याने काम केले जाईल. विकासाचा फायदा सामान्य माणसापर्यंत पोहोचवणे हेच महायुतीचे धोरण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा आपला निर्धार आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रचार सभेला सरपंच बंडू बाबर, तानाजी बाबर, विश्वनाथ आप्पा बाबर, दादासाहेब बाबर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित नागरिकांनी विकासाच्या मुद्द्यावर महायुतीला स्पष्ट पाठिंबा देत विजयाचा निर्धार व्यक्त केला.

पान १ वरून

# दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला...

याचा निकालावर मोठा प्रभाव पडणार आहे. विशेषतः ग्रामीण भागात पक्षापेक्षा व्यक्ती, कुटुंब आणि स्थानिक गट यांनाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अधिकृत उमेदवारासोबतच बंडखोर उमेदवारही निवडणुकीची दिशा बदलू शकतात.

**भाजपचा 'शतप्रतिशत भाजप'चा नारा**

भाजपने यंदा 'शतप्रतिशत भाजप'चा नारा देत बहुतांश ठिकाणी स्वतंत्रपणे उमेदवार उभे केले आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर आपला झेंडा फडकवण्याचा निर्धार भाजपने केला असून, प्रचारात केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा मोठ्या प्रमाणावर उल्लेख केला जात आहे. त्याच्या तुलनेत काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांची स्थिती कमकुवत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. अनेक ठिकाणी संघटनात्मक बांधणी ढासळलेली असून, प्रभावी उमेदवारांच्या अभावामुळे हे पक्ष अडचणीत सापडले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांनी मात्र काही मतदारसंघांत ताकद लावली आहे. विशेषतः पारंपरिक प्रभाव असलेल्या भागांत त्यांनी प्रतिष्ठेची लढाई लढवली आहे.

# इंटरस्कूल ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत एस.एन.डी.स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश




**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** बारामती येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या चौथ्या इंटरस्कूल ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत एस.एन.डी.इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. १ गोल्ड मेडल, २ सिल्वर मेडल,२ ब्रांज मेडल व मानाची ट्रॉफी मिळवून शाळेचे नाव लौकिक केले आहे.यामध्ये प्राची मसाजी थोरात ( इ.७ वी ) १४ वर्ष वयोगटात वजन ४१ ते ४५ किलो गटामध्ये.( गोल्ड मेडल ) प्रथम क्रमांक, अन्वी अनिल चौगुले (इ.५वी) १४ वर्ष वयोगटात वजन २१ ते २५ किलो गटामध्ये.(सिल्वर मेडल) द्वितीय क्रमांक,विश्वराज युवराज मोरे ( इ.६ वी ) १४ वर्ष वयोगटात वजन २५ ते ३० किलो गटामध्ये ( सिल्वर मेडल ) द्वितीय क्रमांक,सानवी अमोल मोरे (इ.६ वी) १४ वर्ष वयो गटात वजन ४१ ते ४५ किलो गटामध्ये (ब्रांज मेडल) तृतीय क्रमांक, स्वप्नाली अमोल मोरे ( इ.९ वी ) १७ वर्ष वयोगटात वजन ४५ ते ५० किलो गटामध्ये.( ब्रांज मेडल ) तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल रेणुका महिला पतसंस्थेच्या चेअरमन सुचित्रादेवी देशमुख यांच्या शुभ हस्ते वरील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सुचित्रादेवी देशमुख बोलत असताना म्हणाल्या की, मुलांच्या जीवनात जसे अभ्यासाला महत्त्व आहे तेवढेच शारीरिक व्यायाम खेळ यांनाही महत्त्व आहे. मोबाईल मुळे मुलांचे मैदानी खेळ कमी झाले आहेत.

शिक्षणामुळे मुलांचा मानसिक विकास होतो पण मैदानी खेळामुळे मुलांचा शारीरिक विकास होतो. खेळाच्या स्पर्धेमध्ये विजय आणि पराजय हे गुण आत्मसात होतात परंतु खेळाचे नेतृत्व केल्याने विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य वाढत असल्याचे मत सुचित्रादेवी देशमुख यांनी व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप मुख्याध्यापक शकूर पटेल, प्राथमिक विभाग प्रमुख वर्षा गुळीग, पीआरओ मनोज राऊत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## बेताल बोल

### दम आणि दाटी

निवडणूक कोणासाठी
कोरी करकरीत पाटी आहे...
एका बाजूला दम आहे तर
दुससरीकडे भलतीच दाटी आहे...
या गर्दीत आपलाच आता
निभाव लागला पाहिजे....
वाटून झाले वाटायचे ते,फक्त
मतदार... ला जागला पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक : पंढरपूर तालुक्यातील मतदानासाठी यंत्रणा सज्ज

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी दि.०७ फेब्रुवारी २०२६ रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. या निवडणुकीत दोन लाख ८५ हजार ८२७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी 1 हजार 700 अधिकारी कर्मचारी नियुक्ती करण्यात आली असून, पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.तालुक्यातील ३०९ मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मतदान यंत्रे तयार करण्याची प्रक्रिया रविवारी उमेदवारांच्या व प्रतिनिधींच्या उपस्थित पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आली. मतदानासाठी मतदान केंद्रावर 309 कंट्रोल युनिट व 408 बॅलेट युनिट संच तयार करण्यात आले आहेत. तसेच 64 कंट्रोल युनिट व 116 बॅलेट युनिट संच राखीव ठेवण्यात आले आहेत.


मतदान यंत्राच्या सुरक्षेसाठी आवश्यकती खबरदारी घेण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेसाठी मतदान केंद्राध्यक्ष, सहा. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी क्र. एक व दोन तसेच शिपाई अशा 1 हजार 700 अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शुक्रवार दिनांक 6 फेब्रुवारी रोजी सकाळी 9.00 वाजता शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथून मतदान पथकांना साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी 22 टेबलची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त आहे. नियुक्त केलेल्या विशेष वाहनांद्वारे ही पदके नेमून दिलेल्या केंद्राकडे रवाना होतील.

तालुक्यात वाखरी येथील मतदान केंद्र क्रमांक 158 आदर्श महिला मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे तर टाकळी येथील मतदान केंद्र क्रमांक 240 येथे आदर्श मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे. तसेच कासेगाव येथील मतदान केंद्र क्रमांक 285 (निकम वस्ती) हे मतदान केंद्र संवेदनशील मतदान केंद्र असुन त्याठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दिनांक 07 फेब्रुवारी रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान पार पडणार आहे. तालुक्यातील सर्व मतदारांनी लोकशाही बळकट करण्यासाठी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा असे, आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# माजी लष्करप्रमुखांच्या पुस्तकाचा दाखला देत राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल




**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी चीन सीमावादाच्या मुद्द्यावर केंद्र सरकारवर पुन्हा एकदा तीव्र टीका केली. माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्राचा दाखला देत त्यांनी संसद परिसरात सरकारवर गंभीर आरोप केले.

राहुल गांधी यांनी सांगितले की, चीनचे रणगाडे भारतीय सीमेच्या दिशेने येत असताना भारतीय सैन्य प्रत्युत्तरासाठी सज्ज होते. मात्र संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी कारवाईबाबत कोणतेही स्पष्ट आदेश दिले नाहीत, असा आरोप त्यांनी केला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्या वेळी जबाबदारी झटकली आणि सैन्य एकटे पडले, असा दावा त्यांनी केला.

संसद परिसरात पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी नरवणे यांच्या पुस्तकाची प्रत दाखवत, 'सरकार म्हणते हे पुस्तक अस्तित्वात नाही, पण हे पाहा ते पुस्तक. देशातील प्रत्येक युवकाने ते पाहावे,' असे म्हणाले. संसदेत या पुस्तकातील उतारे वाचण्याची परवानगी मिळत नसल्याचाही त्यांनी आरोप केला.

पुस्तकातील एका प्रसंगाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, लष्करप्रमुखांनी चीनच्या हालचालींबाबत संरक्षणमंत्र्यांकडे पुढील कारवाईसाठी आदेश मागितले होते. त्यावर 'वर विचारून सांगतो' असे उत्तर देण्यात आले.

तसेच चीनचे सैन्य प्रत्यक्ष सीमारेषा ओलांडत नाही तोपर्यंत गोळीबार करू नये, असा संदेश देण्यात आल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला.

या संदर्भात पंतप्रधानांनी 'जे योग्य वाटेल ते करा' असा संदेश पाठवल्याचा उल्लेख करत कठीण प्रसंगी सैन्याला एकटे सोडल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच हे पुस्तक पंतप्रधानांना भेट देणार असल्याचेही त्यांनी सांगितले

# 40 महाविद्यालयांचे लेखापरीक्षण ठप्प; प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विभागीय सहसंचालक कार्यालय आणि लेखाधिकारी कार्यालयाच्या कासवगतीमुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठासह संलग्न सुमारे ४० अनुदानित महाविद्यालयांचे लेखापरीक्षण अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विद्यापीठाचे मागील सहा ते सात वर्षांचे लेखापरीक्षण झाले नसून अनेक महाविद्यालयांचे ऑडिट १२ ते १५ वर्षांपासून रखडले आहे.

लेखापरीक्षण न झाल्याने शासकीय अनुदान, विद्यार्थ्यांकडून घेतलेले शुल्क आणि खर्चाचा हिशेब केवळ कागदोपत्रीच जुळवला जात असल्याचे चित्र आहे. उच्च शिक्षण विभागाचे लेखाधिकारी कार्यालय विद्यापीठ परिसरात असले तरी एकाच लेखाधिकाऱ्यावर शहर व जिल्ह्यातील ४१ महाविद्यालयांच्या लेखापरीक्षणाची जबाबदारी असल्याने कामकाजावर परिणाम होत आहे. कर्मचारी प्रशासकीय कामांसाठी सोमवारी दिवसभर कार्यालयात येरझाऱ्या घालत असल्याची स्थिती आहे.

नियमांनुसार दरवर्षी महाविद्यालयांनी ३१ जुलैपूर्वी ऑडिट अहवाल विभागीय शिक्षण सहसंचालक, लेखाधिकारी आणि अकाउंटंट जनरल मुंबई यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच तीन वर्षांच्या आत विभागीय शिक्षण सहसंचालक व लेखाधिकारी कार्यालयाने लेखापरीक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक महाविद्यालयांचे ऑडिट दशकभरापासून प्रलंबित आहे.

काही महाविद्यालयांचे रेकॉर्डही नष्ट झाल्याचे समोर आले आहे. बार्शी येथील झाडबुके महाविद्यालयाचे कागदपत्र आगीत जळाल्याचे सांगण्यात आले, तर दयानंद महाविद्यालयाच्या नोंदींना वाळवी लागल्याने २०११ पासून ऑडिट रखडल्याची माहिती आहे.

लेखाधिकारी गोविंद बोंदर यांनी सांगितले की, 'महाविद्यालयांचे लेखापरीक्षण व कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीची जबाबदारी माझ्यावर आहे. कार्यालयात मी एकटाच असल्याने निवडणुकांसह इतर कामांनाही प्राधान्य द्यावे लागते. महाविद्यालयांकडून वेळेत आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यानेही विलंब होतो.'

राज्य शासनाने लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र पॅनल नेमल्याची माहिती देण्यात आली असून प्रलंबित ऑडिट लवकर पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ४९ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**"बी-१ निविदा"**

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि. १४/०२/२०२५

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पुर्ण करीत व सा.बां. विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या व नमूद केलेल्या कंत्राटदाराकडून खालीली कामा करिता बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक विभाग. सोलापुर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय विश्रामगृह सोलापूर येथील व्ही व्ही आय पी इमारतीतील उत्तरा व रेवती कक्षाचे नुतनीकरण करणे. ता. उत्तर सोलापूर. जि. सोलापूर. | बी-१ निविदा | ५७,९९,७९९/- | आय-३ |

| | |
|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०६/०२/२०१६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते १३/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | ---निरंक--- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि. १३/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा :- शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर ७२ तासात "हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि.१४/०२/२०२६ मा.कार्यकारीअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/- (मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(डीजीआयपीआर-२०२५-२६/क्र-५/सी५५८२)

**जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुका - २०२६**

**मतदार बंधू- भगिनींनो, आपलं**


**एक मत जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट)**

**आणि**

**एक मत पंचायत समिती निर्वाचक गणासाठी (गण)**

**अवश्य द्या!**

**मतदान यंत्रावरील (बीयू) मतपत्रिकांचे रंग**



**जि. प. गटाची मतपत्रिका असेल पांढऱ्या रंगाची**

**पं. स. गणाची मतपत्रिका असेल गुलाबी रंगाची**

(उमेदवारांची संख्या जास्त असल्यास आवश्यकते नुसार एकपेक्षा अधिक मतदान यंत्रांचा (बीयू) वापर करण्यात येतो)

**मतदान दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वेळ - सकाळी ७:३० ते सायं. ५. ३०**


**मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी 'मताधिकार' मोबाईल ॲप आणि https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळाची सुविधा**

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

MaharashtraSEC

**कर मतदान...**
**सांगतंय संविधान!**

## कटूसत्य शब्दकोडे




**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 170

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# मराठा समाजावर अन्याय, भाजपविरोधात मतदानाचे आवाहन; मराठा क्रांती मोर्चाचा इशारा






**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर पदावर गेल्या तीन दशकांपासून मराठा समाजाला डावलण्यात आल्याचा आरोप करत मराठा समाजात तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे. यंदा तब्बल तीन दशकांनंतर मराठा समाजाला महापौर करण्याची संधी असतानाही ती हिरावून घेतल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोचार्चे राज्य समन्वयक रामभैय्या जाधव यांनी स्थानिक भाजप नेतृत्वावर थेट बोट ठेवले आहे.

रामभैय्या जाधव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १९९३ नंतर गेल्या ३२ वर्षांत सर्वच राजकीय पक्षांनी मराठा समाजाला महापौर पदापासून वंचित ठेवले आहे. महापौर पद सर्वसाधारण प्रवगार्साठी असतानाही ओबीसी समाजातील उमेदवाराला महापौर करण्यात आल्याने मराठा समाजावर अन्याय झाल्याची भावना तीव्र झाली आहे.

त्यांच्या मते, १९९३ नंतर विविध पक्षांनी तीन वेळा पद्मशाली समाजाला, दोन वेळा मुस्लिम समाजाला, दोन वेळा लिंगायत समाजाला, दोन वेळा लमाण समाजाला, तर एक वेळा ब्राह्मण, कैकाडी आणि धनगर समाजाला महापौर पदाचा मान दिला आहे.

मात्र, संख्येने मोठा, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणारा मराठा समाज मात्र सातत्याने दुर्लक्षित राहिला असल्याचा आरोप त्यांनी केला.

'आम्ही कोणत्याही व्यक्ती किंवा समाजाच्या विरोधात नाही. प्रत्येक समाज हा आमचा लहान भाऊ आहे. मात्र गेल्या ३२ वर्षांपासून मराठा समाजाचा महापौर झाला नाही, म्हणून आम्ही केवळ न्यायाची मागणी केली होती,' असे जाधव यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजावर झालेला हा राजकीय अन्याय समाज कधीही विसरणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. यापुढे शैक्षणिक, राजकीय, नोकरी आणि सामाजिक क्षेत्रात मराठा समाजावर अन्याय झाल्यास रस्त्यावर उतरून आवाज उठवला जाईल, असे त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर ७ तारखेला होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये सोलापूर व माढा मतदारसंघातील मराठा समाजातील मतदारांनी मतपेटीतून भाजपविरोधात मतदान करून उत्तर द्यावे, असे थेट आवाहन रामभैय्या जाधव यांनी केले आहे.


या वक्तव्यामुळे सोलापूरच्या राजकारणात खळबळ उडाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मराठा समाजाची भूमिका निर्णायक ठरणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सेवा निवृत्तीचा इतिहास पुस्तकात मांडणारे डॉ. रामप्रकाश पंजाबी

## 'ॲक्युसॅट' संघटनेवरील पुस्तकाचे नागपुरात भव्य विमोचन








**सोलापूर (कटूसत्य वृत्त) –** सोलापूर सोशल कॉलेजचे सेवा निवृत्त ग्रंथपाल डॉ. रामप्रकाश अमीरचंद पंजाबी (धिंग्रा) यांनी महाराष्ट्रातील सेवा निवृत्त प्राध्यापकांच्या संघटनेवर सविस्तर संशोधनात्मक पुस्तक लिहून एक महत्त्वपूर्ण साहित्यिक व शैक्षणिक योगदान दिले आहे. 'ॲक्युसॅट'(Association of College and University Superannuated Teachers – Maharashtra) या संघटनेच्या कायार्चा इतिहास, उद्दिष्टे व वाटचाल मांडणाऱ्या या पुस्तकाचे अलीकडेच नागपूर येथे विमोचन झाले.

ॲक्युसॅट संघटनेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ डिसेंबर २०२५ (रविवार) रोजी वानखेडे सेलिब्रेशन हॉल, कळमण, नागपूर येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्राच्या विविध भागांतून तब्बल ९५ सेवा निवृत्त प्राध्यापकांनी उपस्थिती लावली होती. याच महत्त्वपूर्ण सभेमध्ये डॉ. पंजाबी यांनी लिहिलेल्या 'ॲक्युसॅट' या पुस्तकाचे औपचारिक विमोचन करण्यात आले.

सध्या ॲक्युसॅट संघटनेचे अध्यक्ष डॉ. वाहूळ एम.ए., सचिव प्राचार्य डॉ. मंत्री जे.एम., खजिनदार प्राचार्य नाफडे एस.बी., ट्रस्टी प्राचार्य मोहमद शफी असे पदाधिकारी आहेत.

डॉ. रामप्रकाश पंजाबी यांनी हे पुस्तक स्वतःच्या खर्चाने प्रकाशित करून सभेत १०० प्रती विनामूल्य वितरित केल्या. सेवा निवृत्त प्राध्यापकांमध्ये संघटनेचा प्रसार व प्रचार व्हावा, तसेच नव्या पिढीला या चळवळीचा इतिहास समजावा, हाच या उपक्रमामागचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या पुस्तकाची मूळ किंमत ६०० रुपये असून, सध्या ५० टक्के सवलत दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक अंगांनी परिपूर्ण असलेले हे पुस्तक सेवा निवृत्त प्राध्यापकांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे, अशी प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही शिक्षणक्षेत्राशी निष्ठा ठेवून लिखाणाच्या माध्यमातून योगदान देणाऱ्या डॉ. पंजाबी यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

# बार कौन्सिल निवडणूक २४ मार्चला महिलांसाठी प्रथमच विशेष संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या निवडणुकीची घोषणा गुरुवारी करण्यात आली असून येत्या २४ मार्च रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत प्रथमच महिलांसाठी ७ जागा आरक्षित ठेवण्यात आल्याने या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. सोलापुरातील तीन आजी-माजी जिल्हा सरकारी वकिलांसह सात जणांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी केली आहे. यात महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, माजी जिल्हा सरकारी वकील संतोष नाव्हकर, हेमलता शिंदे, विक्रांत फताटे, असिम बांगी आणि धनश्री घाडगे यांचा समावेश आहे. एकूण २५ सदस्यांची निवड होणार असून त्यापैकी ७ जागा महिलांसाठी आरक्षित असतील, तर उर्वरित १८ जागांसाठी पुरुष उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत.

जाहीर निवडणूक कार्यक्रमानुसार ५ फेब्रुवारी रोजी मतदार यादी प्रसिद्ध होईल. १२ फेब्रुवारीपर्यंत हरकती स्वीकारल्या जातील आणि १९ फेब्रुवारीला अंतिम मतदार यादी जाहीर होईल. २६ फेब्रुवारीला नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख असून २८ फेब्रुवारीला छाननी होणार आहे. १ मार्चला उमेदवारांची प्राथमिक यादी आणि २ मार्चला अंतिम यादी प्रसिद्ध होईल. मतदान २४ मार्च रोजी होणार आहे.

# महापौर व उपमहापौर पदाच्या निवड प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांची पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेत आज होणाऱ्या नूतन महापौर व उपमहापौर पदाच्या निवड प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित कार्यालये व सभागृहांची पाहणी केली.

यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापौर कार्यालय, उपमहापौर कार्यालय, सभागृह नेते कार्यालय तसेच यशवंतराव चव्हाण सभागृह येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

उद्या होणाऱ्या निवड प्रक्रियेची तयारी, व्यवस्था, बैठक नियोजन, सभागृहातील आसन व्यवस्था, सुरक्षा व इतर अनुषंगिक बाबींचा आढावा घेण्यात आला.

महापौर व उपमहापौर निवड प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडणार आहे, कायदेशीर तरतुदी, नियमावली तसेच निवड प्रक्रियेदरम्यान घ्यावयाच्या दक्षता याबाबतची सविस्तर माहिती नगर सचिव प्रवीण दंतकाळे यांच्याकडून आयुक्तांनी घेतली.

निवड प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पडावी, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या पाहणी प्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सौ. सारिका आकूलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, प्रकाश दिवानजी, युवराज गाडेकर, महादेव इंगळे, रजाक पेंडारी, नितीन गायकवाड आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्या लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या या निवड प्रक्रियेसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून आवश्यक त्या सुविधा व व्यवस्था उपलब्ध करून द्याव्यात, असेही आयुक्तांनी यावेळी निर्देशित केले.

# अकलूजमध्ये सहकार महर्षींच्या स्मरणार्थ विशेष आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज तसेच विविध संस्थांच्या वतीने कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी कै. शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील यांच्या ४७ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ ते ८ या वेळेत सहकार महर्षींच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक समाधीस्थळ ते शिवरत्न बंगला मार्गे कारखान्याच्या मुख्य कार्यालयापर्यंत काढण्यात येणार आहे. त्यानंतर मुख्य कार्यालयासमोरील सहकार महर्षींच्या पूणार्कृती पुतळ्यास पुष्पचक्र व पुष्पहार अर्पण करण्यात येणार असून त्यांच्या जीवनावर शालेय विद्यार्थ्यांची भाषणे आयोजित करण्यात आली आहेत.

याच दिवशी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. अंकुश महाराज रणखांबे (रा. गिरवी) यांचे सुश्राव्य श्रीहरी कीर्तन श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# कामती जि.प.गटात भाजपा चा झेंडा फडकवा- राजन पाटील

## विमलताई खताळ व कोमल आवताडे यांच्या प्रचारार्थ सभा



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** मागील जिल्हा परिषद निवडणुकीत जनतेने वेगळा निर्णय घेतला होता. मात्र तालुक्याचे कसं वाटोळं झालं हे पाहिलं आहे. आता देखील तालुक्याच्या विकासासाठी नव्हे तर स्वतःच्या स्वार्थासाठी ही मंडळी एकत्र येऊन वेगवेगळी चिन्ह घेतली आहेत.

यशवंत माने आमदार असताना तालुक्याला हजार कोटींचा निधी मिळाला. सध्या तालुका विकासापासून वंचित झाला आहे त्यामुळे आज आपल्याला योग्य भूमिका घेण्याची वेळ आली असून कामती गटातील सर्व उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन माजी आमदार राजन पाटील यांनी केले.

कामती येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी आमदार राजन पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश वानकर, सज्जन पाटील, दीपक माळी, रामराव भोसले-पाटील, जयसिंग आवताडे, जि.प. उमेदवार विमलताई खताळ, पं. स.उमेदवार कोमल आवताडे, अक्षय खताळ, अंकुश आवताडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, स्व.तानाजीराजे खताळ हा माझा प्रामाणिक कार्यकर्ता होता. दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत मात्र त्यांची पत्नी विमलताई आणि कर्तुत्वान मुलगा अक्षय यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. येणाऱ्या काळात संपूर्ण जि.प. गटाचा कायापालट करण्यासाठी भरीव विकास करण्यासाठी भाजपच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन त्यांनी शेवटी केले.

### विकासाच्या मुद्द्यावर राजकारण झालं पाहिजे

– तालुक्यात राजन पाटील यांची हुकुमशाही, गुंडगिरी मला कधीच दिसली नाही. मात्र निवडणुका आल्या की पावसाळ्यातल्या छत्र्या बाहेर येऊन अनगरकर पाटलांवर टीका करतात. निवडणूका नेहमीच विकासाच्या मुद्द्यावर झाल्या पाहिजे. मात्र विकास कामांबद्दल शब्द बोलायचा नाही. फक्त टीका करून पोट भरण्याचं आणि जनतेची दिशाभूल करण्याचे काम हे लोकं करत आहेत. – यशवंत माने

### कामती गटात सर्वाधिक लीड मिळाला पाहिजे

– देशात नरेंद्र व राज्यात देवेंद्र अशा या राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम असलेल्या व्यक्तिमत्वाकडून महाराष्ट्र घडविण्याचे काम सुरू आहे. न भविष्यती असा विकास भाजपा सरकारच्या नेतृत्वाखाली झाला आहे. सोलापूर जिल्ह्याला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासारखं विकासप्रिय नेतृत्व मिळालं आहे. तुम्ही कामती गटातून विमलताई खताळ व कोमलताई आवताडे यांना सर्वाधिक लीड द्या क्रांती विभागाचा कायपालट करण्याचं मी वचन देतो.

– शशिकांत चव्हाण जिल्हाध्यक्ष, भाजप


# अनगर नगरपंचायत, अनगर

ता.मोहोळ, जि.सोलापूर पिन-४१३२१४

स्थापना - ०१/११/२०२१

दुरध्वनी क्रमांक : ०२१८९-२४८५२३ Email ID: comcangar7@gmail.com

क्र.२०२६/बांधकाम/बारं/९२ दिनांक ०५/०२/२०२६

## निविदा प्रसिध्दीकरण सुचना

अनगर नगरपंचायत हद्दीतील इमारतीचे बांधकाम करणे व अनगर नगरपंचायत मधील विविध विभागाकडील विविध विकास कामांचे प्रकल्प अहवाल व बाबनिहाय अंदाजपत्रके (D.P.R& Plan Estimate), स्टील डिझाईन घेणे, तांत्रिक मान्यता घेणे, विकास कामांची देखरेख करणे, नोंदी घेणे व इतर अनुषंगिक सर्व कामकाज करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणे करीता शासनाकडील नोंदणकीकृत अनुभवी ठेकेदार तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक निविदेद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे निविदा फॉर्म दिनांक ०६/०२/२०२५ ते १२/०२/२०२६ पर्यंत अनगर नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध असून सदर कामाच्या किंमती बाबत व निविदा किंमत व निविदा स्विकृती इत्यादींची माहिती अनगर नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

सही/-
(सुरेश भदर)
मुख्याधिकारी
अनगर नगरपंचायत, अनगर


# पृथ्वीराज सावंत यांना निवडून देणे हाच एकमेव पर्याय- दादासाहेब साठे



**माढा (कटूसत्य वृत्त):-** 'मानेगावच्या जनतेला फसवणूक नको, तर ठोस काम हवे आहे. केवळ आश्वासनांचे राजकारण आता संपले पाहिजे. या भागातील रखडलेले प्रश्न मार्गी लावायचे असतील, तर पृथ्वीराज सावंत यांना निवडून देणे हाच एकमेव पर्याय आहे,' अशा थेट आणि आक्रमक शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दादासाहेब साठे यांनी आपली भूमिका जाहीर केली आणि मानेगाव जिल्हा परिषद मतदारसंघातील राजकीय गणिते एकाच फटक्यात बदलून टाकली. मानेगाव जिल्हा परिषद गटातून भाजपचे उमेदवार पृथ्वीराज सावंत, तर दारफळ पंचायत समिती गणातून मीराबाई आवासाहेब ठोंबरे निवडणूक रिंगणात असून, साठे यांच्या जाहीर पाठिंब्याने या दोन्ही उमेदवारांचे पारडे चांगलेच जड झाले आहे. राष्ट्रवादीतील नेतृत्वाने भाजपच्या बाजूने भूमिका घेतल्याने विरोधकांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे. प्रचारादरम्यान बोलताना पृथ्वीराज सावंत यांनी, 'दादासाहेब साठे यांचा अनुभव आणि जनतेशी असलेला थेट संपर्क हा आमच्यासाठी मोठा आधार आहे. विकासाच्या मुद्द्यावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही,' असे सांगत विरोधकांच्या अपयशाकडे बोट दाखवले. गेल्या अनेक वर्षांत मानेगाव परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि रोजगाराचे प्रश्न जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

दादासाहेब साठे यांनीही आपली भूमिका अधिक धारदार करत, 'या भागात निवडणुकीपुरते चेहरे बदलतात, पण जनतेचे प्रश्न तसेच राहतात. भाजपकडेच विकासाची स्पष्ट दिशा आणि निर्णयक्षमता आहे,' असे ठणकावून सांगितले.

या पार्श्वभूमीवर वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत आणि युवा नेते वेदांत साठे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीने संपूर्ण परिसरात शक्तिप्रदर्शन केले. या रॅलीत युवकांचा उस्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. 'युवकांचा कौल आता विकासाच्या बाजूने झुकला आहे,' अशी चर्चा गावागावात रंगू लागली आहे.

एकंदर, साठे गटाचा उघड पाठिंबा, युवकांची वाढती ताकद आणि भाजपची आक्रमक प्रचार रणनीती पाहता मानेगाव मतदारसंघात भाजपने निर्णायक आघाडी घेतल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. विरोधकांसाठी ही निवडणूक आता अस्तित्वाची लढाई ठरण्याची चिन्हे आहेत.